




# निशांत

भाग -२



## जीवनोपयोगी ज्ञान

# *निशांत - भाग २*

ऑक्टोबर १९९६

संपादक / प्रकाशक

महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ

दिंडोरी - ४२२ २०२

लेखन व संकलन सहभाग

सखाराम गावित  अर्जून दारोळे

पोपट बोर्डे  यादव माघाडे

लुकस दिवे  साविओभाऊ

कला सजावटः गॉडफ्री डिलीमा

कम्पुटर मुद्रणः लुकस दिवे

(खाजगी वितरणासाठी)

# नि शां त

भाग - २

# आमचे मनोगत

" निशांत " ची ही पहिली मालीका गावातल्या तळा गळातील युवक - युवतींसाठी लिहीली जात आहे. प्रत्येक गावामध्ये अशा व्यक्ति आहेत की ज्यांना सामाजीक कारणास्तव औपचारिक शिक्षणातून बाहेर पडावं लागतं किवां बाहेर ढकललं जातं. परंतु ह्यांपैकी अनेक जण आशा बाळगतात की स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी जीवन जगावं. ह्यां इच्छूक व्यक्तिनां " निशांत " आम्ही समर्पीत करतो.

जीवन उपयोगी ज्ञान स्वावलंबनाच्या वाटेवर पहिली पायरी आहे. असे ज्ञान आपल्या भागातल्या सोप्या व प्रचलित भाषेत सादर करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. ही मालिका वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तिची ज्ञानचिकित्सा ऊफाळून यावी जेणेकरून आणखी ज्ञान प्राप्त करण्यास त्यांचे धाडस वाढावे व स्वतःचे भविष्य आपल्याच हाताने घडवता यावे, हीच आमची मनिषा.

ज्ञानाचा शोध घेण्यास आम्हाला ही अनमोल संधी लाभली म्हणून आपले चिकित्सक बंधु-बधिनिनां शतशः धन्यवाद. तसेच ह्या पुस्तकांचा मालिकेच्या उगम काळापासून म. प्र. से. मंडळाचे संचालक, ब्रायनभाऊ, ह्यांचा पाठींबा व मार्गदर्शन लाभले, तसेच म. प्र. से. मंडळाचे अनेक विस्तार अधिकाऱ्याचे सहाय्य व सहकार्य लाभले. नाहीतर हे स्वप्न अधुरे राहीले असते. यात तीळ मात्र शंका नाही; या सर्वांना मनापासून धन्यवाद

संपादक मंडळ

साविओ भाऊ

# अनुक्रमणिका

**गद्य विभाग:**


१. तळमळ ६
२. भूमिअभिलेखा ७
३. पाणी १४
४. शोषखड्डा १७
५. पितर २०
६. बदल २२
७. बाशींग २३
८. दारीद्र्य रेषा २६
९. पुदिना २९
१०. अंक वाचन लेखन ३१


**पद्य विभाग**


१. ग म भ न ३४
२. माती आडवा हो ३५
३. जंगलचा राजा ३६
४. तोड ही चाकोरी ३८
५. संकट टाळू ३९
६. चांगले दिवस ४०

धडा १ ला.

# तळमळ

चिंचपाडा गावात भावडू शेतकरी रहात होता. पाच एकर जमीन दोन बैल व एक दुभती गाय ही त्याची संपत्ती होती. त्याला आनंदा व लता नावाचे मुले होते. येणाऱ्या शेतीच्या उत्पन्नातून घर प्रपंच चालवून त्याने मुलांचे शिक्षण केले. उच्च शिक्षण घेऊन आनंदा गावात आला होता. आनंदाला त्याचे बालमित्र भेटले व गप्पा मारु लागले.

मधूः काय आनंदा तु खूप शिकलास, आता तुला मोठी नोकरी लागेल. तु साहेब होशील बाबा.

सदूः आनंदा खरच तू नशिबवान आहेस. आम्हाला शिकता आले नाही. मी मधिच शाळा सोडली. तुला पाहून माझी मलाच लाज वाटते.

बाळूः तू आता शहरात जाशील , मोठा साहेब होशील, आईवडिलांना, आम्हा दोस्तांना, व गाय, बैल, जमीन यांना सोडून लांब राहशील. तुला आठवण येईल का रे आमची?

त्या रात्री आनंदला चांगली झोप लागली नाही. सारखी तळमळ चालू होती. मित्रांचे बोलणे त्याला एक सारखे खटकत होते. शिक्षणासाठी आई-वडिलांना सोडून दूर राहिल्याने मला गावाची, आई-वडिलांची ओढ नेहमीच वाटते. मला गाव सोडून आवडत नाही. काय करावे बरे?

आपण जर आपलीच शेती सुधारीत पध्दतीने केली तर? आपल्या जमिनीवरच काम करून, गावातच राहून, शिक्षणाचा उपयोग करता येईल का? शिक्षण घेवून दुसऱ्याची चाकरी करण्यापेक्षा, शेती सुधारून गावाची सुधारणा करणे चांगले. माझ्या मित्रांना सुध्दा त्याचा उपयोग होईल. माझ्या शिक्षणाचा उपयोग माझ्या शेतासाठी व गावासाठी होईल. असेच झाले तर....

एवढयात पहाट झाली व आई त्याला उठवायला आली.

चर्चेसाठी विषय:

१) आपल्या गावात शिकलेली मुले आहेत का?

२) गावात जास्त शिकलेले कोण कोण आहेत?

३) शिकलेल्यांपैकी किती लोक नोकरीला आहेत? गावात/बाहेर?

४) नोकरीला असलेल्यांपैकी, ते गावात किती वेळा येतात?



५) शिकलेले शेतात काम करतात का?

६) शिक्षणाचा फायदा शेतात व गावात होतो का?




अक्षर ओळख:

त, ळ, म, ळ

ळ, ळा, ळि, ळी, ळं

लेखन सराव:



नको शहरातली चाकरी, बरी कष्टाची भाजी भाकरी.

## धडा २ रा. भूमिअभिलेखा (जमिनीचे मोजमाप)

पहाट झाली. आनंदची आंघोळ झाली. न्याहारी करुन तो शेतावर गेला. सुर्याची कोवळी किरणे त्याच्या तोंडावर पडली. त्याचा चेहरा उजळून दिसत होता. सुधारीत पध्दतीची शेती करायची, हा निर्णय पक्का केला. त्याने शेतीची पहाणी केल्यावर वडिलांना शेताच्या बांधाविषयी विचारले.

आनंदः काय रे बा. हे आंब्याचे झाड आपल्याच शेतात होतं ना? मग तिकडे कस काय गेलं? तुम्ही माझ्या शिक्षणासाठी जागा विकली की काय?

बाः तुझ्या मोठया बांनी बांध सरकावला. जाऊ दे. मोठा भाऊ आहे ना माझा. काय बोलणार?

आनंदः बा, आता झाड गेले. हळुहळु तो अजून बांध सरकावेल. आणि आपण गप्प बसायचं का?

बाः अरे, तो नेहमीच बांध सरकावतो. पण मोठा भाऊ म्हणून मी काहीच बोलत नाही.

आनंदः बा, आता असं होता कामा नये.

आनंदला ही गोष्ट खटकली. त्याने आपली जमीन मोजण्याचे ठरवले. आणि जमीन मोजमाप (भूमिअभिलेखा) आधिकाऱ्याकडे अर्ज केला.

जमीन मोजण्यासाठी अर्ज कुठे व कसा करावा?

१) भूमिअभिलेख खात्याचे ऑफिस प्रत्येक तालुक्यात असते.

२) जमीन मोजणीसाठी अर्ज, जमीन धारकास, म्हणजे ज्याच्या नावी ७/१२ उतारा आहे, त्यालाच करता येतो. दुसऱ्याची जमीन आपल्याला मोजता येत नाही.



अर्जात पुढील माहिती असावी:

१) अर्जदाराचे पूर्ण नाव व पत्ता.

२) जमीन मोजायची, तिचा सर्वे नंबर/पोट हिस्सा, गट नंबर.

३) मोजणीचे कारण.

४) तक्रारीची माहिती देणारा कच्चा नकाशा.

५) झाडे दर्शवून पाहिजे असल्यास अर्जात स्पष्ट उल्लेख.

६) मोजणी करायच्या जमिनीच्या चतुःसीमेतील खातेदारांची नावे व पत्ते.

७) अर्जास ०.६५ पैशाचे कोर्ट तिकीट.

८) अर्जाखाली ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या धारकांच्या सहया/अंगठे.

९) अर्जासोबत मोजणी करायच्या जमिनीची प्रचलीत दराचे फी भरलेले चलन (पावती) जोडावे.



चलन भरण्यासाठी दर पत्रकः

अ) साधी मोजणीः पहिले दोन सर्वे/गट नंबर किंवा ६ हिस्से प्लॉटस् किंवा १० हेक्टर क्षेत्र मोजणीसाठी रू.२५०/-. प्रत्येक जास्त सर्वे/गट नंबर मोजणीकरिता रू.१००/-. प्रत्येक जास्त हिस्सा/प्लॉट मोजण्यासाठी रू.५०/-

आ) तातडीची मोजणीः साध्या मोजणी फीच्या दराच्या दुप्पट.

इ) अतितातडीची मोजणीः साध्या मोजणी फीच्या दराच्या तिप्पट.

१०)७/१२ उतारा तीन महिन्याच्या आतले पाहिजे. हा अर्ज समक्ष किंवा पोस्टाने देता येतो. कागद पत्राची पुर्तता झाल्यावर शेतकऱ्यांना भूमापण खात्याखडून मोजणी केव्हा यईल हे कळवले जाते.

चर्चेसाठी विषयः

१) आपल्या गावात अतिक्रमण आहे का?

२) आपल्या गावात जमिनीचे मोजमाप झाले आहे का?

अक्षर ओळख:

भ म अ भ ल ख

भ, भा, भि, भी, भु, भू, भे, भो, भं

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ, अं

ख, खा, खि, खी, खु, खू, खे, खो, खं

शब्द बनवा:

आभार, भाकर, अभिनव, भात, आत, भारत, भिम, भूक

अंतर, आज, आळस, आजार, आरंभ, आरसा

खत, खाऊ, खार, खारट, खावखाव, खेळ, खीर, खटपट

लेखन सराव:

भ अ ख

मोजून घेऊ भूमि, वाद होतील कमी.

धडा ३ रा. पाणी

मोहपाडा, नार नदीच्या काठी वसले आहे. सकाळी लोकांची गर्दी महादूच्या घरासमोर झाली. महादूची लेक रखमा बाळंतपणाला आली होती. दिवस भरायच्या आधीच ती मरण पावली. लोक आपसात कुजबुजत होते.

महादूची बायकोः काशी डोशी (म्हातारी )ची ही करणी आहे. म्हणून माझी रखमा मेली.



कोणी म्हणत हिला भूत लागले होते. यावरून लोकांत तंटा निर्माण झाला. मोठी भानगड होणार होती. एवढयात पोलीस पाटील पोलीसांना घेऊन गावात आले. रखमाचे प्रेत चिरफाड करण्यासाठी व मरणाचे कारण शोधण्यासाठी, दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टरच्या तपासणीतून समजले की तिला कावीळ होऊन, ती मेली. लोकांचे वाद मिटले, पण कावीळ कशाने होते, हा प्रश्न लोकांपुढे उभा राहिला.

दुसऱ्या दिवशी डॉक्टर गावात आले. अशुध्द पाण्यामुळे कावीळ झाली व रखमा मेली, हे सांगितले. तसेच अशुध्द पाण्यापासून पटकी, नारू, घटसर्प, गॅस्ट्रो , पोलीओ, हगवण, खरूज, विषमज्वर, इत्यादी. अनेक आजार होतात. उघडे व वाहते पाणी पिऊ नका. शक्यतो हातपंपाचे पाणी प्या व जर हात पंप नसेल, तर विहिरीचे पाणी अथवा वाहते पाणी स्वच्छ कपडयाने गाळून घ्या. उकळून, थंड करून वापरा. किंवा टी. सी. एल., क्लोरीनच्या गोळया, पोटॅशियम इ. औषधे टाकून शुध्द पाणी प्या. गढुळ पाण्यात तुरटी फिरवा, आणि शक्यतो शुध्द पाणी प्या. त्यामुळे आजार होणार नाही व डॉक्टरांना होणारा खर्च वाचेल.



चर्चेसाठी विषयः

१) आपल्या गावात विहिरी व हातपंप किती?

२) पिण्याचे पाणी आपण कुठून आणता?


३) गावात नळ योजना आहेत का?

४) पाण्यात औषधे टाकतात का? कोण टाकतो?

## अक्षर ओळखः

प ण


ण, णा, णि, णी, णु, णू, णे, णो, णं




## शब्द बनवाः

आणि, आणीबाणी, गाणी, गोणी, लोणी, राणी, ताणा, आपण, घण, पण, ठणठण, घणघण, म्हणी, माणूस.

## लेखन सरावः



पाणी प्या गाळून, आजार जाईल पळून.

धडा ४ था. **शोषखड्डा**

तळेगावात नवीनच नळ योजना सुरू झाली. प्रत्येक गल्लीत स्टॅन्ड पोस्ट बांधले. नळाला पाणी आले व सर्व गावकरी खूष झाले. बायांना हंडयाने दूरून पाणी आणण्याचा त्रास कमी झाला. पण दोन महिन्यात दुसरा त्रास सुरू झाला. गावात खूपच मच्छर झाले. या वर्षी एवढे मच्छर गावात का झाले? पोरं-बाळं तापाने का आजारी पडू लागली? ह्या समस्या गावासमोर उभ्या राहिल्या. गावात मलेरिया पसरू लागला. डॉक्टर म्हणाले, सांडपाण्यामुळे गावात मलेरिया झाला. गाव सभा भरली. मलेरियाचा नायनाट झालाच पाहिजे. ग्रामसेवक म्हणाला, पंचायती मार्फत आपण गटारी बांधू व गावातील साचलेले पाणी दूर काढून देऊ. पण गावातील प्रत्येक घराने आपल्या घरातील सांडपाण्यासाठी शोषखड्डा बांधला पाहिजे. त्यामुळे सांडपाणी खड्डयात जाईल. डास होणार नाहीत.

शोषखड्डा कसा असावा?



खड्डा कमीत कमी १ मीटर खोल व १ मीटर रूंद असावा. तो चौकोणी किंवा गोल असावा. खड्डा भरताना खाली विटांच्या तुकड्याचा थर दयावा. नंतर जाड वाळूचा थर. मध्यभागी एखादे जुणे मडके, त्याला खलून छिद्रे पाडणे. मडक्यात नारळाच्या शेंडया टाकाव्या. मोरीचा पाईप किंवा सांडपाण्याचा पाईप मडक्यात सोडावा. त्यामुळे पालापाचोळा किंवा कागदाचे तुकडे मडक्यात अडकतात व पाणी खड्डयात शोषले जाते. एखादे झाड तिथे लावले तर उपयुक्त ठरते.



शोषखड्डयाचे फायदे:

१) घरातील सांडपाणी रस्त्यावर जात नाही.

२) डबकी साचत नाही.

३) डास होत नाही.

४) मलेरियाला प्रतिबंध होतो.

५) घर व घराचा परिसर स्वच्छ राहतो.

चर्चेसाठी विषय:

१) आपल्या गावात डबके साचतात का?

२) सांडपाणी कुठे जमा होते?

३) आपल्या गावात डास आहेत का?


४) गावात मलेरिया कशाने होतो?

५) शोषखडा कसा करावा? शोषखडयाचे फायदे काय?

अक्षर ओळख:

श ष ख ड

लेखन सराव:



डासांचा नायनाट करण्यासाठी, घरोघरी शोषखड्डा खोदा.

धडा ५ वा. **पितर** (पितृ आमवस्या)

माणसे मरून पितृलोकात जातात व वंशजांना पितर ठरतात. सर्व मृत पूर्वजांना 'पितर' म्हटले जाते. व देवाचे सामर्थ्य त्यांच्यात आहे असे समजून त्यांची पूजा केली जाते. भाद्रपद महिन्याच्या अमावस्येस हा सण आदिवासी साजरा करतात. या दिवशी घरातील जे मृत व्यक्ती आहेत त्यांना सदगती (शांती) लाभावी म्हणून हा सण साजरा करतात. शेतात तयार झालेले नवीन धान्य व भाजी, विषेशकरून डांगर, दोडके, गिळके एकत्र शिजवून त्यांची भाजी तयार करतात. काही लोक त्यात मासे टाकतात. ही भाजी व भात पळसाच्या पानावर एकत्र कालवून त्यात तूप टाकून आगारी (नैवद्य) जळत्या चूलीत टाकतात व घरावर बोनं (नैवद्य) ठेवतात. बोनंला कावळा शिवल्यावर, पितरांना आपले जेवण मिळाले असे समजतात. नंतर आलेले पाहूणे व घरातील लोक एकत्र जेवण करतात.



चर्चेसाठी विषयः

१) आपल्या गावात पितर साजरा करतात का?

२ पितर केव्हा व कसा साजरा करतात? त्याच्या मागच्या भावना काय असतात?

अक्षर ओळखः


प त र

प, पा, पि, पी, पु, पू, पे, पै, पो, पौ, पं, पः
त, ता, ति, ती, तु, तू, ते, तै, तो, तौ, तं, तः
र, रा, रि, री, रु, रू, रे, रै, रो, रौ, रं, रः

शब्द बनवाः

पत्ता, परी, पुरूष, ताप, रात्र, पंप, पूतळा, पूर, रिवाज, रोप, पतंग, तूप, पती, पत्नी, तुरटी, रस, तार, पोतं, पुरोहीत.


लेखन सरावः



एकत्र सण साजरा करू, एकमेकांशी बांधिलकी वाढवू.

धडा ६ वा. बदल

खाली ८ रेषा (काडया) घेऊन त्यापासून मासा बनवला आहे. उजवीकडील मासा खाली पहातोय. तीन रेषा बदलून, तो वर पहांतोय, असे करा.




१) खाली पाहणारा मासा हे देशाच्या आजच्या साक्षरतेची परिस्थिती आहे. बदललेल्या तीन रेषा म्हणजे :

अ) साक्षरता ब) कार्यात्मक कौशल्य क) जाणीव जागृती अशा आहेत. या तीन बदलामुळे परिस्थिती चांगल्या भविष्याकडे वळवता येईल. आणि देशातील साक्षरतेचे प्रमाण उंचवता येईल, याचे प्रतिक आहे.

२) खाली पाहणारा मासा हे देशाच्या परिस्थितीचे रूपक आहे. बदललेल्या तीन रेषा म्हणजे :

अ) एकता ब) सहकार्य क) संघटना

अशा आहेत. या तीन बदलामुळे परिस्थिती चांगल्या भविष्याकडे वळवता येईल. आणि देशातील तळागाळातील व्यक्तींना मान वर करून बघण्यास मदत होईल.वर दिलेला खेळ दोन संदर्भात दाखवला आहे.

## धडा ७ वा. बाशींग

चिंचपाडा गावातील लोकांच्या शेतीची रोपणी आटोपली होती. या वर्षी पाऊस चांगला पडल्याने पिके जोमदार होती. सहाजिकच लोक आनंदी होते. गावाचा शिवार हिरवागार दिसत होता. आनंदच्या शेतातील कामे आटोपली होती. आज बैल पोळ्याचा सण. त्याने आपले बैल ढवळ्या-पवळ्या, यांना नदीवर नेले व न्हाऊ घातले. घरी आल्यावर बैलांच्या शिंगांना सुरेख रंग दिला. अंगावर रंगाचे ठिपके मारले. अंगावर झुल टाकली. नंतर तो बैलांना बाशिंगे बांधायला गेला पण दोन्ही बैल त्याला बाशिंगे बांधू देईनात. ते सारखे मानेने त्याला नाकार देऊ लागले. त्याला काही सुचेना, तोच त्याचा बा तेथे आला.

आनंदा: बा, या ढवळ्या-पवळ्याला काय झाले बरं? आंघोळ घातली, रंग रंगोटी केली तेव्हा काहीच त्रास दिला नाही. पण आता बाशिंग बांधू देईना.

बा: अरे आनंदा. हे काय लहान बाशिंगे बनवलेत त्यांना? दरवर्षी मी त्यांना मोठे बाशिंगे बांधतो. मग इतके लहान बाशिंगे या वर्षी कसं काय चालणार? अरे ते आपल्यासाठी शेतात कष्ट

करतात. अन्न-धान्य त्यांच्या सहाय्यानेच पिकते. त्यांचा हा वर्षात एकच सणाचा दिवस. त्यांचे ऋण फेडण्यासाठी हा सण असतो. तू मोठे बाशिंगे बनव व वाजत-गाजत देवळात मिरवणूकीसाठी ने. आनंदने मोठे बाशिंगे बनवले. तेव्हा ढवळ्या-पवळ्या बाशिंगे बांधायला उठून उभी राहिली. नंतर ऐटीत मिरवणूकीत सामील झाली. मिरवणूकीहून आल्यावर आनंदच्या बायकोने त्यांना ओवाळले व पूजा केली. मग त्यांना पुरण पोळी खाऊ घातली. बैलांना पुरण पोळी दिल्यावर त्यांनी बैलांना बांधले. व त्यांनी सुध्दा पुरण पोळी व खीर यांचे जेवन करून हा सण साजरा केला.



चर्चेसाठी विषयः

१) आपल्या गावात बैल पोळा कसा साजरा करतात ?

२) बैल कसे सजवतात ?

३) बैलाची मिरवणूक काढतात का ?

४) मिरवणूकीत कोणाचे बैल पुढे असतात ? का ?

अक्षर वाचनः ब श ग

ब बा बि बी बे बो बू बं बें

श शा शि शी शे शो शू शं


ग गा गि गी गे गो गू गं गें

शब्द बणवाः ब पासुन शब्द बणवू.

बदल, बदक, बटन, बाळ, बंधण, बंदूक, बावठा, बाविस, बकरी, बाज,

बेसन, बाटली, बाबू, बांबू, बोंब, बादली, बटर, बडबड.

अक्षर लेखनः



आला आला श्रावनात बैल पोळा

सण साजरा करायला गाव झाला गोळा.

## धडा ८ वा. दारीद्रय रेषा

भारत हा शेतीप्रधान देश आहे. ७० टक्के जनता शेती व शेतीवर आधारीत उदयोगावर अवलंबून आहे. देशातील जास्तीतजास्त जमीन निसर्गावर अवलंबून असल्याने पिकाची खात्री देता येत नाही. हे देखील गरीबीचे एक कारण आहे. त्यामुळे लोक स्तलांतर करत आहेत. यावर मार्ग काढण्यासाठी भारत सरकारने दारीद्रय निर्मुलन करण्यास योजना सुरू केली. तिला एकात्मिक ग्रामीन विकास योजना म्हणतात. ही योजना खालील लोकांना लागू पडते.

१) भूमिहीन शेत मजूर.

२) पाच एकर पर्यंत जमीन असलेले.

३) रू. ११००० पेक्षा कमी वार्षिक ऊत्पन्न असणाऱ्या कुटूंबांना.

गावाचा सर्वे करतांना अश्या कुटूंबांची छाननी केली जाते. ग्रामसेवक व संबंधित अधिकारी नंतर त्यांना दारीद्रय रेषेचे कार्ड देतो. सदर कार्डावर त्या कुटूंबाचे वार्षिक ऊत्पन्न, कुटूंबातील व्यक्ती व जमिनीची नोंद असते. सदर कार्ड धारकांना खालील योजनांचा लाभ घेता येतो.

१) गायी, म्हशी, शेळ्या. २) बैलजोडी-गाडी.

३) कारागीर असेल तर हत्याराची पेटी.
४) लघुउद्योगासाठी साहित्य.
५) शेती सुधारण्यासाठी.

यासाठी लागणारे कागदपत्र म्हणजे जाती ऊत्पन्नाचा दाखला, ७/१२ खाते उतारा, सोसायटीचा व बँकेचा कर्ज नसल्याचा दाखला. हे प्रकरणे ग्रामसेवकाकडून बी डी ओ ऑफिसला संबंधित अधिकाऱ्याकडे जातात. अर्जाची छाननी करून सदर अर्ज जवळच्या बँकेकडे पाठवून त्या बँकेकडून कर्जपुरवठा केला जातो.




चर्चेसाठी विषय:

आपल्या गावात दारीद्रय रेषेचा सर्वे झाला आहे का ?
किती लोकांना दारीद्रय रेषेचे कार्ड मिळाले ?
या कार्डाचा किती लोकांनी लाभ घेतला ?
किती कुटूंबांना कार्ड मिळायला पाहिजे होते पण मिळाले नाही ?


अक्षर वाचनः

द र ष

जोड अक्षरः द् + र = द्र

द् + र् + य = द्रय

अक्षर लेखनः



जोड धंद्याचे उत्पन्न वाढवा
भारत देशाचे दारीद्रय घालवा.



धडा ९ वा. पुदिना



पुष्कळ वेळा आपल्या भागात थंडीताप, मलेरीया, विषमज्वर (टायफाइड) इ. सारख्या रोगाने लोक आजारी पडतात. उपचारासाठी डॉक्टर कडे धाव घ्यावी लागते. काही गावात डॉक्टरच नाहीत व रहदारीची सुध्दा सोय नाही. त्यामुळे डॉक्टरकडे परगावी जावे लागते पण वेळेवर पोहचता येत नाही. डॉक्टर असले तरी पैशाअभावी आपल्याला उपचार करून घेता येत नाहीत. यासाठी घरगुती उपाय म्हणून पुदिना या वनस्पतीचा वापर करावा. हे तुळशीच्या पानाप्रमाणे दिसणारे झुडूप आहे. पानांना विशिष्ट सुगंध व तिखट चव असते. भारतात याच्या ६ जाती आढळतात.

**उपयोग:** पुदिनाच्या पानांचा उपयोग स्वयंपाकात स्वादासाठी होतो. हि तरतरी आणणारी वायुनाशी (पोट साफ करणारी) वनस्पती आहे. याच्या पानाचा चहा तयार करतात. विषावर


उतारा म्हणून वापरतात. हे गर्भारपणातील उलट्यावर गुणकारी आहे. ताप, थंडीताप, मलेरीया, श्वासनलीकादाह, यावर गुणकारी आहे. पुदिनापासुन तेल काढतात. तेल काहिसे पिवळट हिरवे असते. त्याला विशिष्ट सुगंध व चव असते. हे तेल कोलगेट सारख्या दंतमंजनात, चॉकलेट-गोळ्यामध्ये व मिठाईमध्ये टाकतात.

पध्दतः ताप आल्यास अंगाखाली पाला पसरून टाकणे.
ताप आल्यास पाल्याचा रस अंगाला लावणे.
पाल्याची चटणी करुन खाणे.
तोंडाची दुर्गंधी येत असल्यास पाने चावावीत.

चर्चाः आपल्या गावात आजार आल्यास कोणते इलाज करतात ?
आपल्या गावात एखादा वैदू आहे का ?
तुम्ही पुदिन्याचा वापर केला का ? करता का?
इतर कोणते झाडपाल्याचे औषधे वापरतात का ?
कोणकोणत्या आजारासाठी कोणत्या वनस्पती वापरल्या जातात त्याची यादी करा.



## धडा १० वा. अंक वांचन-लेखन




| | | | |
|---|---|---|---|
| १ | | ११ | |
| २ | | १२ | |
| ३ | | १३ | |
| ४ | | १४ | |
| ५ | | १५ | |
| ६ | | १६ | |
| ७ | | १७ | |
| ८ | | १८ | |
| ९ | | १९ | |
| १० | | २० | |

गाळलेल्या जागा भरा:

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | ५ | | ७ | | |
| ११ | | १३ | | १५ | | | १८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | | | १५ | | | १८ | |




वर्तुळातील अंक वाचा आणि ओळीने लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| | | |

बेरीज कराः

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ९ | ८ | ५ | २ |
| ५ | २ | ४ | ४ | ८ |
| | | | | |

एका झाडावर १० पोपट बसलेत. शिकाऱ्याने एक पोपट बंदूकीने मारला. त्या झाडावर किती पोपट रहातील ?

# पद्द विभागः

## ग म भ न (मधुकर माघाडे)

गरिबीच दुःख जरी उरी
ग म भ न शिकते मी घरी ।।धृ.।।
स्वाभिमानाचा हा संसार
कसं गिरविते मी अक्षर (२)
किती संकट आले तरी...।।१.।।
जरी डोंगर हा दुःखाचा
दिवस येइल तो सुखाचा (२)
हसती मला शेजारी पाजारी..।।२.।।



देतो साथ मला माझा धनी
रोज शिकवी मला उजळणी (२)
हिच जीवनाची संगत न्यारी...।।३.।।
अक्षरांची ओळख मज झाली
साक्षरतेचा शृंगार आज ल्याली (२)
घेतयं मन माझ आकाश भरारी.।।४.।।
अज्ञानाचे कुंपन काढीले
तिथे ज्ञानाचे रोप लाविले (२)
मधूफुलांचा सुगंध भारी..।।५.।।



# माती आडवा हो (लुकस दिवे)

माती आडवा हो पाणी जीरवा
धरतीच्या पोटात पाणी मुरवा ।।धृ.।।
पाऊस पडुन गेला किती
नदीला पूर वाढली भित
वाहून जाणारे पाणी थांबवा..... ।।१.।।
पाणी आहे हो जन जीवन
पुराचे पाणी राक्षसी रावण
सागरात जाणारे पाणी आडवा....।।२.।।
पडला पाऊस तर वाढतील पिकं
नाही पडला तर शेती सुकं
गाव आपला करण्या हिरवा.... ।।३.।।
पाण्याचे फायदे सांगु किती
पाण्यावर पिके आपली शेती
शेतात आपल्या पाणी फिरवा.....।।४.।।
पाणी करीते आत्मशांती
पिकली पिकं तर सोनं चांदी
कित्ता हृदयी खोल गिरवा..... ।।५.।।

# जंगलचा राजा

टेकडीच्या पायथ्याला छोटासा गाव रं, जंगलचा राजा
हाय तुझं नाव ।।धृ.।।

शेतात गाळून कष्टाचा घाम,काळ्या मातीत पिकवतो सोनं
तुझं असुनी जंगलच रान, तुलाच नाही खायाला दाणं
पोटात भूकेची रोज कावकाव रं, जंगलचा राजा... ।।१.।।

नडीला देतो कर्ज सावकार, मुदला परास व्याजच फार
भांडी-कुंडी इकली गहानसारं, कर्जाच्या बोजानं झाला बेजार
वरून सावकाराचं तुलाच भ्याव रं, जंगलचा राजा..।।२.।।



कुऱ्हाड घेउनी जातो फाट्याला, भितनाही कधि तू इंचू काट्याला
तुझ्या कष्टाच्या भल्या मोळीला, विकुन पैसं का पुरतीपोटाला
जशी सरड्याची कुंपावर धाव रं, जंगलचा राजा..... ।।३.।।
पाण्यासाठी किती सोशितो कळ, नाही धरण विहीर तळ
आला पाऊस तर भरतया खळ,नायतर वर्षाचा कोरडादुष्काळ
जगाया नस्तो जरा बी वाव रं, जंगलचा राजा...... ।।४.।।
आदिवासी दादा जागा हो आता, वेळ आली हातात घे ईला-कोयता
नद्या नाले झुडपं डोंगर माथ्याला, हाक दे समद्या समिंदराला
समिंदराचा घे आता ठाव रं, जंगलचा राजा....... ।।५.।।



# तोड ही चाकोरी

तोड मर्दा तोड ही चाकोरी
तोड बाई तोड ही चाकोरी
मुक्तीचं गीत म्हणा रात हाय आंधळी ।।धृ.।।

सुर्याचा प्रकाश सर्वा समान
जमिनीतल्या पोटातलं पाणी समान
फिरणारा वारा सर्वा समान हाय रं
जमीन का सर्वांना समान नाय रं ।।१.।।

दिल्लीच्या वाटेला कुंपन हाय रं
संसद नावाचं दुकान हाय रं
स्वातंत्र्य स्वातंत्र्य कशात हाय रं
रोटी मागेल त्याला बंदूक हाय रं ।।२.।।



## संकट टाळू (सखाराम गावीत)

झाडी जंगले नष्ट झाली रं
भुकं मरण्याची वेळ दादा आली ।।धृ.।।
आमची शेती नागली भाताची
वरी खुरसाणी आहे उडदाची
एका पाण्याविना सर्व मेली रं ।।१.।।
जमीन आमची उतार भागाची
दगड गोटे आहे मुरमाची
शेती पिकण्याजोगी नाही राहिली रं ।।२.।।
घालू उताराला आडवे बांध
माती आडवू पाणी जिरवू
धूप जमिनीची आपली थांबवू रं
भूकं मरण्याच संकट टाळू रं ।।३.।।



# चांगले दिस (अर्जून दारोळे)

एक दोन तीन, नको होऊ लिन
चार पाच सहा, गावात एकी करून पहा
सात आठ नऊ, आहे आपण सारे भाऊ
दहा अकरा बारा, सुधारीत पध्दतीने शेती करा
तेरा चौदा पंधरा, बांधू गावात छोटा बंधारा
सोळा सतरा अठरा, पाण्याचा होईल निचरा
एकोणाविस आणि विस, मग येतील चांगले दिस

